# नवी मुंबई महानगरपालिका

## स्थायी समिति

स्थायी समितीच्या **दिनांक १५ डिसेंबर २०१०** रोजी भरलेल्या सभेतील **मंजूर /नामंजूर** इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसूदा स्वरुपात खालील प्रमाणे आहे:-

**विषय क्र.१**
**दि.१५ डिसेंबर २०१०**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे/अनधिकृत बांधकाम हटविणे, फेरीवाला हटविणे व हटविण्यात आलेल्या सामानाची नेमून दिलेल्या ठिकाणी वाहतूक करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दिनांक २२/१०/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/अतिक्रमण/२२७६/२०१०.

ठराव क्र.२७३.
**दि.१५ डिसेंबर २०१०**

"उपरोक्त विषयासंदर्भात बेलापूर गट क्र.१ करीता मे.विठ्ठल भोईर आणि कंपनी यांजबरोबर एकूण रु.१२ लक्ष, घणसोली गट क्र. ६ करीता मे.साईदिप कंस्ट्रक्शन यांजबरोबर एकूण रु.१० लक्ष, एरोली गट क्र. ७ करीता मे.साईदिप कंस्ट्रक्शन यांजबरोबर एकूण रु.१२ लक्ष व दिघा गट क्र. ८ करीता मे.दिपा एंटरप्रायझेस यांजबरोबर एकूण रु.५ लक्ष इतक्या खर्चाने एक वर्षाकरीता करार करण्यास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.२**
**दि.१५ डिसेंबर २०१०**

८१ गटातील समग्र साफसफाई व वाढीव ३० गटातील साफसफाई कंत्राटी कामाचा कालावधी दिनांक ३१/०३/२०११ पर्यंत वाढविणेबाबत, आयुक्तांचे दिनांक २५/१०/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/घ.क.व्य./१७३४/ २०१०.

ठराव क्र.२७४.
**दि.१५ डिसेंबर २०१०**

"उपरोक्त विषयासंदर्भात ८१ गटातील समग्र साफसफाई, वाढीव ३० गटातील दैनंदिन साफसफाई व ४ एम.आय.डी.सी.च्या गटातील तसेच घणसोली नोडमधील रस्ते सफाई व कचरा वाहतूकीच्या वाढीव कंत्राटी कामापोटी रक्कम रु.१४,१०,६९,५६२/- इतक्या खर्चाने करार करण्यास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.३**
**दि.१५ डिसेंबर २०१०**

रुपये पन्नास हजारापेक्षा जास्त परंतु दहा लाखापेक्षा कमी खर्चाच्या कामासंबंधी केलेल्या कराराबाबत, आयुक्तांचे दि.०४/१२/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/का.अ.(वि.)/१२३२/२०१०.

**ठराव क्र.२७५.**
**निर्णय:- दफ्तरी दाखल.**

**विषय क्र.४**
**दि.१५ डिसेंबर २०१०**

नवी मुंबई महानगरपालिकेस सन २०१०-११ सालासाठी औषधे खरेदी करण्याच्या कंत्राटाबाबत, आयुक्तांचे दि.०९/१२/२०१० चे पत्र क्र.नमुंमपा/आरोग्य/६५४५/२०१०.

ठराव क्र.२७६.
**दि.१५ डिसेंबर २०१०**

"उपरोक्त विषयासंदर्भात परिशिष्ट "क" मध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदाकरांकडून नमूद बाबी एकूण रक्कम रु.२,४३,६५,७१७/- नुसार खरेदी करण्यास व संबंधित एजन्सी सोबत करार करण्यास, सुचविल्याप्रमाणे, संमती देण्यात यावी."

**निर्णय:- संमत.**

**विषय क्र.५**
**दि.१५ डिसेंबर २०१०**

``एफ`` घणसोली विभागाच्या सन १९९७-९८, १९९८-९९, २००१-०२, २००२-०३, २००३-०४ आणि २००४-०५ या कालावधीतील लेखा परिक्षण अनुपालन अहवालाबाबत, आयुक्तांचे दिनांक १०/१२/२००८ चे पत्र क्र.नमुंमपा/एफ विभाग/१०२४/२००८.

**ठराव क्र.२७७.**
**निर्णय:- आयुक्तांकडे फेरविचारार्थ परत.**